**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**<u>भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचा कुलगुरुंच्या हस्ते सत्कार</u>**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील अकरा विद्यार्थी नेट/सेट/जेस्ट/गेट ही काठीण्य पातळीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, त्याबद्दल त्यांचा कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी सत्कार केला. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, व्य.प. सदस्य तथा भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे उपस्थित होते. गेल्या पंचवीस वर्षात नेट/सेट/जेस्ट/गेट सारख्या राष्ट्रीय पातळीवर छप्पन्न विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. मागील पाच वर्षात चवतीस उमेदवार पात्र झाले आहेत. भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार यांचे प्रामुख्याने विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभत असते. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त परिश्रम करावे, यासाठी ते सातत्याने प्रोत्साहन देतात. त्यांच्या नेतृत्वाखाली भौतिकशास्त्र विभाग सातत्याने प्रगतीपथावर आहे. संचालन विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार यांनी केले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १५/०६/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी